दै. उ. मराठवाडा (१)

# मनपा निवडणुकीसाठी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध

नांदेड (प्रतिनिधी) - नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी निवडणूक विभागाने प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध केली असून मतदारांनी काही हरकती व सूचना असल्यास लेखी स्वरूपात कळवाव्या लागणार आहेत.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूककरिता राज्य निवडणूक आयोगाने दि. २५ जुलै रोजी मतदार यादी तयार करणे व प्रसिद्ध करणे या अनुषंगाने मनपा प्रभाग १ ते २० प्रभाग मतदारयादी जनतेसाठी पाहण्याकरिता खुली आहे. क्षेत्रीय क्र. अ तरोडा येथे प्रभाग क्र. १, २, ३, क्षेत्रीय क्र. ब शिवाजीनगर/ अशोकनगर येथे प्रभाग क्र. ४, ५, ६, ७, ८, ९, १० आणि क्षेत्रीय कार्यालय क्र. क इतवारा/वजिराबाद अंतर्गत प्रभाग क्र. ११, १२, १३, १४, १५, १६, १७, १८, क्षेत्रीय कार्यालय क्र. ड सिडको/वाघाळा प्रभाग क्र. १९ व २० या पद्धतीने मतदारयादी पाहण्याकरिता उपलब्ध केली आहे. दि. २८ ऑक्टोबर पर्यंत हरकती स्वीकारल्या जाणार आहेत.

सत्यप्रभा (२)

# प्रारूप मतदार यादीसंदर्भात हरकती, सूचना दाखल करण्याचे आवाहन

## २० प्रभागांची मतदार यादी पाहण्यासाठी उपलब्ध

नांदेड दि. १८ (प्रतिनिधी)- नांदेड वाघाळा महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक अवघ्या काही दिवसांवर येवून ठेपली असून या निवडणुकीची जय्यत तयारी प्रशासकीयस्तरावर सुरू आहे. सदरील निवडणुकीसंदर्भात असलेली प्रभाग क्रमांक १ ते २० मधील प्रभागाची मतदार यादी जनतेस पाहण्यासाठी मुख्यकार्यालय आणि चारही क्षेत्रिय कार्यालयात उपलब्ध आहे. सदरील प्रारूप यादीसंदर्भात हरकती व सूचना दाखल करावे असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे. महापालिकेच्या वतीने दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की, नांदेड महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक २०१७ करीता निवडणूक आयोगाचे पत्र दि. २५ जुलै २०१७ च्या अनुषगाने मतदार यादी तयार करणे व प्रसिद्ध करणेबाबतचा कार्यक्रम निश्चित करून दिला आहे. नांदेड वाघाळा महानगरपालिकेच्या प्रभाग क्रं. १ ते २० मधील प्रभागांच्या मतदार यादी जनतेस पाहण्यासाठी क्षेत्रिय कार्यालय अ तरोडा अंतर्गत १, २, ३ प्रभाग क्षेत्रिय कार्यालय ब शिवाजीनगर, अशोकनगर अंतर्गत ४, ५, ६, ७, ८, ९, १० प्रभाग, इतवारा वजिराबाद क अंतर्गत ११ ते १८ आणि सिडको वाघाळा ड अंतर्गत १९, २० प्रभागांची मतदार यादी जनतेस पाहण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे. निवडणूक आयोगाच्या आदेश आणि निर्देशानुसार प्रारूप मतदार यादीसंदर्भात काही हरकती सूचना असल्यास १९ ऑगस्ट ते २८ ऑगस्टपर्यंत संबंधित क्षेत्रित कार्यालयात लेखी स्वरूपात दाखल कराव्यात असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.